# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
## निम्नस्तर कृषि शिक्षण विभाग

## प्रवेश सूचना

निम्नस्तर कृषि शिक्षणांतर्गत शैक्षणिक वर्ष सन २०२०–२०२१ ची कृषि तंत्र पदविका, मत्स्य अभियांत्रिकी पदविका व बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया दिनांक ८.९.२०२० पासून ऑफलाईन पध्दतीने राबविण्यात येत होती. सदर प्रवेश प्रक्रियेमध्ये कृषी व पदमु विभागाच्या शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १५१४/प्र.क्र.१००/७ अे, दिनांक ०८.०७.२०१९ अन्वये सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्गाकरीता १२ टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आल्या होत्या तथापि, मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. ९.९.२०२० रोजी सदर आरक्षणास स्थगिती दिली असल्याने याबाबत शासनामार्फत पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत सदर प्रवेश प्रक्रिया दिनांक २५.९.२०२० नंतर पुढे तात्पुरती स्थगित करण्यात येत आहे. तसेच याबाबतचे सुधारीत वेळापत्रक पुढील निर्देश प्राप्त होताच विद्यापीठ संकेतस्थळ www.dbskkv.org वर व विद्यालयांमध्ये प्रसिध्द करण्यात येईल.

क्र.डॉ.बासाकोकृवि/निकृशि–ई/ ४७५ / २०२०
दिनांक. २५.९.२०२०

कुलसचिव
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण
कृषि विद्यापीठ, दापोली